FDA MAHARASHTRA

आयुक्त,
अन्न व औषध प्रशासन,म.राज्य.,
३४१, वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स,
रिझर्व्ह बॅंकेच्या समोर,वांद्रे (पूर्व),
मुंबई-४०० ०५१
comm.fda-mah@nic.in

# निविदा संच उपाहारगृह चालविणे

Tender Notice No.

अन्न व औषध प्रशासन,म.राज्य.

COMMISSIONER, FOOD & DRUGS ADMINISTRATION (M.S.)
सत्यमेव जयते
★ MUMBAI ★

FDA MAHARASHTRA

आयुक्त,
अन्न व औषध प्रशासन,म.राज्य.,
३४१, वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स,
रिझर्व्ह बॅकेच्या समोर,वांद्रे (पूर्व),
मुंबई-४०० ०५१
comm.fda-mah@nic.in

निविदा वेळापत्रक

| | |
|---|---|
| निविदेचे नाव | उपाहारगृह चालविणे |
| निविदा स्विकारण्याची मुदत | दि. ११/०९/२०२६ ते १७/०९/२०२६ सकाळी १०.३० ते दुपारी ५.०० पर्यंत अन्न व औषध प्रशासन, मुंबई कार्यालयात नोंदणी विभागात द्यावेत . |
| तांत्रिक निविदा उघडण्याची तारीख | दि. १८/०९/२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता उघडण्यात येतील. |
| व्यावसायिक निविदा | सोबत दिलेल्या प्रक्रियेनुसार तांत्रिक निविदेत पात्र झाल्यानंतर पात्र निविदाधारकांच्याच व्यावसायिक निविदा उघडण्यात येतील. |

टिपः सर्व अटी, शर्ती व सूचना निविदेत बघाव्यात. कोणतीही एक किंवा सर्व निविदा स्विकारण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार मा. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांनी राखून ठेवले आहे.

COMMISSIONER, FOOD & DRUGS ADMINISTRATION (M.S.) * MUMBAI *
सत्यमेव जयते

आयुक्तालय, अन्न व औषध प्रशासन, मुंबई इमारतीत एक वर्षाकरिता उपाहारगृह चालविण्यासाठी पात्र कंत्राटदारांकडून निविदा मागविण्यात येत आहेत. सदर उपाहारगृह उत्कृष्टरित्या चालविल्यास म्हणजेच त्यांचे काम समाधानकारक वाटल्यास दरवर्षी एक अशा पुढील दोन वर्षाकरिता मुदतवाढ देण्यात येऊ शकते. या कंत्राट कालावधीत किंवा त्यानंतरच्या मुदतवाढीत खाद्य पदार्थाच्या ठरलेल्या दरात व अटींमध्ये कोणतेही बदल होणार नाही. जर असे बदल करावयाचे असतील तर स्वतंत्र निविदा काढण्यात येईल.

सदर निविदा दोन लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहे. यामध्ये पहिला लिफाफा हा तांत्रिक निविदेचा असेल व दुसरा लिफाफा हा व्यावसायिक निविदेचा असेल.

लिफाफा -१- तांत्रिक निविदा

लिफाफा २ -व्यावसायिक निविदा

वरील दोन्ही लिफाफे सिलबंद करुन एका मोठ्या पाकीटात टाकून ते सिलबंद करावे. पाकिटावर मोठ्या अक्षरात "निविदेचे नाव व निविदा क्रमांक" लिहावे. सदर पाकिट दिलेल्या मुदतीत प्रत्यक्ष वा टपालाने **मा. आयुक्त ,अन्न व औषध प्रशासन, म. राज्य, मुंबई** येथे पोहोचतील या बेताने नोंदणी विभागात सादर करावे.

## लिफाफा -१- तांत्रिक निविदा

तांत्रिक निविदेमध्ये पात्र होण्याकरिता खालील अटी पूर्तता करणे आवश्यक आहे.

१) निविदाधारकाजवळ हॉटेल, रेस्टॉरंट, उपाहारगृह भोजनालय किंवा ज्यात भोजन व स्नॅक्स तयार करुन पुरविल्या जातात अशा उपक्रमाचा कमीतकमी तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

२) निविदाधारकाजवळ Food Safety & Standards Act २००६ अनुसार परवाना/नोंदणी असणे आवश्यक आहे. सदर परवान्याची/नोंदणीची फोटोप्रत जोडावी.

३) पुरवठाधारक संस्था /अर्जदार नोंदणी प्रमाणपत्र अ-मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम किंवा ब- भागीदार संस्था अधिनियम किंवा क- कंपनी अधिनियम किंवा तत्सम नोंदणी प्रमाणपत्र.

४) निविदाधारकाच्या उपहारगृहाची मागील दोन वर्षाची (२०२४-२५ व २०२५-२६) वार्षिक सरासरी उलाढाल कमीत कमी रु. ५ लाख असणे आवश्यक आहे.
(उपरोक्त सरासरी म्हणजे दोन वर्षांच्या वार्षिक सरासरींची बेरीज भागिले दोन).

५) मागील तीन वर्षाचे Income Tax Return (i.e Assessment Year २०२३-२४, २०२४-२५, २०२५-२६).

६) निविदाधारकांने जीएसटी नोंदणी (आवश्यक असल्यास), पॅन कार्ड व आधार कार्डची छायांकित प्रत जोडावी.

तांत्रिक निविदेत पात्र झालेल्या निविदाधारकांचा दुसरा लिफाफा (व्यावसायिक निविदा) उघडला जाईल.

## लिफाफा -२ व्यावसायिक निविदा

अन्न व औषध प्रशासन, मुंबई इमारतीत उपाहारगृह चालविण्याकरिता व्यावसायिक निविदा

निविदाधारकाने खालील तक्त्यात आपले दर नमूद करावेत (सदर निविदा मान्य झाल्यास या दरात वाढ करता येणार नाही) व्यावसायिक निविदा वेगळ्या पाकिटात सीलबंद सादर करावी. या पाकिटावर लिफाफा-२ व्यावसायिक निविदा असा उल्लेख करावा.

| अ.क्र. | खादयपदार्थाचे नाव व विवरण | प्रती | दर (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| अ | पूर्ण भोजन (अमर्यादित जेवण)<br>पोळी/ पुरी, सुकी भाजी, पातळ आजी, भात, वरण, पापड, दही/कढी रायता, लिंबू कोशिंबीर लोणचे, कांदा, गोड पदार्थ-१ (बासुंदी, आमरस, फुट सलाड, रसमलई, गुलाबजाम, श्रीखंड ई). | प्रती प्लेट | |
| ब | अल्प भोजन (राईस प्लेट)<br>२० सेमी पोळ्या ३, सुकी भाजी-१, पातळ भाजी-१, भात- १ वाटी, वरण, पापड, लिंबू, कोशिंबीर, लोणचे, कांदा इत्यादी. | प्रती प्लेट | |
| क | अत्यल्प भोजन<br>२० सेमी पोळी ३ किंवा भात, पातळ भाजी-१, लिंबू चटणी / कांदा | प्रती प्लेट | |
| ड | नाश्ता :- | | |
| १ | उपमा / शिरा / पोहे | प्रती प्लेट | |
| २ | कांदाभजी/बटाटाभजी /मूंगभजी | प्रती प्लेट | |
| ३ | बटाटेवडा/समोसा/वडापाव व चटणी | प्रती प्लेट | |
| ४ | मिसळ व २ पाव | प्रती प्लेट | |
| ५ | इडली/वडा, सांभार व चटणी | प्रती प्लेट | |
| ६ | ब्रेड-२ नग बटर सह | प्रती प्लेट | |
| ७ | साबुदाणा खिचडी /साबुदाणा वडे-२ | प्रती प्लेट | |
| | सरासरी = एकुण रक्कम भागिले ७ | | |
| इ | पेय :- | | |
| | चहा-१०० मिली | प्रती कप- | |
| | कॉफी-१०० मिली | प्रती कप- | |
| | दुध-२०० मिली | प्रती ग्लास- | |
| | लस्सी-२०० मिली | प्रती ग्लास- | |
| | सरासरी = एकुण रक्कम भागिले ४ | | |
| | एकूण बेरीज = | | |

दिनांक-

शिक्का

COMMISSIONER, FOOD & DRUGS ADMINISTRATION (M.S.) ★ MUMBAI ★ सत्यमेव जयते

निविदाधारकाची स्वाक्षरी व पत्ता-

वरील आवश्यक अटींव्यतिरिक्त खालील अटीची निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

१) उपहारगृहाकरीता आयुक्तालयातील पहिल्या माळयावरील ९५७ चौ.फुट जागा उपलब्ध करुन देण्यात येईल. ज्यामध्ये डायनिंग हॉल, स्वयंपाक घर इ.व्यवस्था असेल. तसेच, पाणी, विज इ. सुविधा निशुल्क दिल्या जातील. या सुविधांच्या रकमेचा विचार करुन कंत्राटदाराने खाद्यपदार्थांचे दर भरणे आवश्यक आहे.

२) आयुक्तालयातील अधिकारी व कर्मचारी तसेच दैनंदिन कार्यालयास भेट देणारे अभ्यागत असे अंदाजे ४०० लोकांकरीता व्यवस्था करावी लागेल.

३) सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांनी उपहारगृहाच्या ९५७ चौ.फुट जागेकरीता चटई क्षेत्र निर्देशांकानुसार आकारलेले सन २०२६-२७ करीता प्रतीमाह भाडे रु. ३६७७५/- (अक्षरी रुपये छत्तीस हजार सातशे पंच्चाहत्तर फक्त) इतके असून कंत्राटदारास दरमहा उपहारगृह भाडे लेखा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन, मुंबई यांचेकडे न चुकता भरणा करावा लागेल.

४) कंत्राटदाराने उपहारगृहामध्ये कार्य करत असलेल्या कर्मचाऱ्यांना स्वच्छ गणवेश देणे आवश्यक आहे. तसेच उपाहारगृहात सेवा देण्यास पुरेसे कर्मचारी उपलब्ध असावेत.

५) उपहारगृहांमध्ये कार्य करित असलेले कर्मचारी आरोग्याच्या दृष्टीने योग्य आहेत याबाबत प्रमाणपत्र सादर करावे लागेल. तसेच प्रत्येक कर्मचाऱ्याचा पत्ता व फोटो व आधारकार्ड आयुक्तालयास सादर करावा लागेल. या कर्मचाऱ्यांवर कुठलीही पोलिस केस नसल्याबाबतचे प्रमाणपत्र द्यावे लागेल.

६) कंत्राटदाराने उपहारगृहामधील फर्निचर तसेच विविध उपकरणांची निगा राखणे आवश्यक आहे. तसेच भोजनकक्ष व स्वंयपाकघर स्वच्छ असणे आवश्यक आहे. उपाहारगृहात उंदराचा व इतर प्राण्यांचा प्रादुर्भाव होणार नाही यासाठी आवश्यक ती उपाययोजना (Paste Control) करणे आवश्यक राहील. तसेच माश्या व किड्यांपासून बचाव करण्याकरिता दोन माश्या प्रतिबंध उपकरणे लावणे आवश्यक आहे.

७) कंत्राटदाराला उपहारगृहामध्ये फ्रीज, पाणी शुध्दीकरण यंत्रासह वॉटर कुलरची व्यवस्था करावी लागेल. तसेच करार कालावधीत इलेक्ट्रिक उपकरणांची आणि अन्य वस्तूंची वेळोवेळी देखभाल व दुरुस्ती करावी लागेल.

८) उपाहारगृहात दररोज तयार होणाऱ्या ओल्या व सुक्या कचऱ्याची विल्हेवाट कार्यालयाने नेमून दिलेल्या ठिकाणीच करावी लागेल. कचऱ्याची योग्य रित्या विल्हेवाट न लावल्यास रु.५००/- प्रतिदिन दंड आकारला जाईल.

९) कंत्राटदाराला उपहारगृहामध्ये कार्य करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांबाबत शासकीय नियम व कायदे पाळणे बंधनकारक राहील.

१०) उपहारगृहातील कर्मचाऱ्यांचे वेतन व सुरक्षेची सर्व जबाबदारी कामगार कायद्याच्या अद्ययावत तरतूदीनुसार कंत्राटदारांची राहील.

११) कार्यालयाने ठरवून दिलेल्या जागी कर्मचारी/अधिकारी व अभ्यांगतांना खाद्य पदार्थ पुरवावे लागतील. तसेच अल्पोपहार व भोजनासाठी ठरवून दिलेल्या जागेचा वापर करावा लागेल.

१२) उपाहारगृहात सकाळी ९ ते संध्याकाळी ७ पर्यंत खाद्यपदार्थ उपलब्ध करुन द्यावे लागतील.

१३) स्वंयपाक घरात आगीसारख्या दुर्घटनेपासून बचाव करण्याकरिता विशेष दक्षता घेणे आवश्यक राहील. कंत्राटदाराने गॅस सिलेंडरची अयोग्यरितीने साठवणूक केल्यास रु. ५००/- दंड आकारला जाईल.

१४) उपाहारगृहात कोणत्याच प्रकारची अमली पदार्थ साठवणूक तसेच त्यांची विक्री करता येणार नाही.

१५) खाद्य पदार्थाच्या मान्य केलेल्या दरांचे दरपत्रक प्रत्येक टेबलावर ठेवणे तसेच उपाहारगृहात तक्रारपेटी ठेवणे आवश्यक राहील.

COMMISSIONER, FOOD & DRUGS ADMINISTRATION (M.S.)
सत्यमेव जयते
★ MUMBAI ★

१६) कंत्राटदाराला कोणत्याही प्रकारची आगाऊ रक्कम कार्यालयामार्फत दिली जाणार नाही.
१७) सदर कराराच्या अनुषंगाने कायदेविषयक बाबी मुंबई येथील न्यायालयाच्या अखत्यारित येतील.

सुरक्षा ठेव-

कंत्राट प्राप्त झाल्यानंतर कंत्राटदाराला सुरक्षा ठेव म्हणून रु. ५०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार फक्त) रकमेचा डीडी ( Account Officer, Food and Drug Administration, M.S. Mumbai यांच्या नावे काढलेला) अन्न व औषध प्रशासन, मुंबई कार्यालयामध्ये जमा करावा लागेल. सदर रकमेवर कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही. त्याचप्रमाणे सदरची रक्कम करार संपल्यानंतर अदा केली जाईल. सदर रक्कम अदा करतांना त्यातून येणे रक्कम वजा करुन उर्वरीत रक्कम अदा केली जाईल.

COMMISSIONER, FOOD & DRUGS ADMINISTRATION (M.S.) ★ MUMBAI ★
सत्यमेव जयते